महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३३९ वा | दिनांक : २३/११/२०२५ | वार : रविवार

## मतदार यादीतील त्रुटी २७ नोव्हेंबरपर्यंत कळवा; ऑनलाईन नाव शोधण्याची सुविधा




**मुंबई** : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या आगामी निवडणुकांसाठी मतदार यादीची प्रक्रिया वेगाने सुरू असून, संबंधित मतदारांनी आपल्या नावाविषयी काही हरकती किंवा तक्रारी असल्यास त्या २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे. प्रभागनिहाय मतदार याद्यांचे विभाजन हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, त्यामध्ये होऊ शकणाऱ्या चुका त्वरित दुरुस्त करण्यासाठी आयोगाने जनजागृती सुरू केली आहे. या प्रक्रियेचा थेट संबंध निवडणूक व्यवस्थेच्या पारदर्शकतेशी असल्याने नागरिकांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. महानगरपालिका निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित करण्यात आला आहे. त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्याच महानगरपालिका निवडणुकांसाठी मूळ आधार मानल्या जाणार आहेत. या याद्या भारत निवडणूक आयोगाने तयार केल्या असून, त्यांचे प्रभागनिहाय विभाजन स्थानिक महानगरपालिका आयुक्तांच्या देखरेखीखाली करण्यात आले आहे. प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या २० नोव्हेंबर २०२५ रोजी सार्वजनिक करण्यात आल्या असून, प्रत्येक प्रभागातील मतदार आपले नाव ऑनलाईन तपासू शकतात. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecvoterlist.in/ObjectionOnClick/SearchName ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये नवीन नावे समाविष्ट करणे, नावे वगळणे किंवा मतदारांचे पत्ते दुरुस्त करणे यासारखी कार्यवाही या टप्प्यात केली जात नाही. हे काम केवळ भारत निवडणूक आयोगाच्या नियमित अद्ययावत प्रक्रियेतच केले जाते. महानगरपालिका स्तरावर केवळ विधानसभेच्या याद्यांवर आधारित प्रभागनिहाय विभागणी केली जाते. त्यामुळे नागरिकांनी या प्रक्रियेतील मर्यादा समजून घेत हरकती केवळ प्रभागनिहाय विभागणीतील चुका किंवा चुकीच्या नावांच्या स्थानांतरासंदर्भातच कराव्यात, असे आयोगाचे स्पष्ट निर्देश आहेत.

अनेकदा लेखनिकांकडून झालेल्या तांत्रिक किंवा टायपिंगच्या चुकांमुळे मतदाराचे नाव चुकीच्या प्रभागात दिसणे, विधानसभेच्या यादीत असूनही प्रभागात न दिसणे किंवा घर क्रमांकाच्या आधारे प्रभाग बदलण्यात गफलत होणे असे प्रकार आढळून येतात. अशा स्वरूपाच्या चुकांबाबत संबंधित महानगरपालिकेत हरकती आणि सूचना दाखल करता येतील. आयोगाने यासाठी स्वतंत्र काऊंटर व अधिकारी नेमण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांनी वेळेत तक्रार केल्यास निवडणूकपूर्व काळात याबाबत आवश्यक दुरुस्ती केली जाईल.

## एकनाथ शिंदेंच्या लाडक्या बहिणीनं हाती बांधले घड्याळ

**सातारा** : नगरपालिका निवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी (शुक्रवारी) महाबळेश्वरात नाट्यमय घडामोडी घडल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी बहिण मानलेल्या माजी नगरसेविका विमल ओंबळे यांनी प्रभाग 4 मधून उमेदवारी अर्ज मागे घेत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. त्याचबरोबर आपल्याच समर्थकाने नगराध्यक्षपदासाठी केलेली बंडखोरी राष्ट्रवादी काँग्रेसने मोडून काढली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काही दिवसांपूर्वी सातारा दौऱ्यावर आले असताना त्यांनी शिवसैनिकांचा मेळावा घेतला होता. त्यावेळी त्यांनी महाबळेश्वरमधील मानलेली बहिण विमल ओंबळे यांची राजकीय जबाबदारी कुमार शिंदे यांच्यावर सोपवली होती. मात्र, ऐन निवडणुकीत कुमार शिंदेंनी ओंबळे यांचा पाठिंबा काढून त्यांच्या विरोधातील उमेदवार विमल बिरामणे यांना पाठिंबा जाहीर केला. ही बाब ओंबळे यांनी शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवली. मात्र, त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे विमल ओंबळेंनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. शिवाय शिवसेनेचा त्याग करून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या मानलेल्या बहिणीनेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. विमल ओंबळे या महाबळेश्वर पालिकेच्या नगरसेविका होत्या. मागील निवडणुकीत त्या निवडून आल्या होत्या. एकनाथ शिंदेंनी त्यांची राजकीय जबाबदारी शिवसेना पदाधिकारी कुमार शिंदेंवर सोपवली होती, मात्र, ऐनवेळी त्यांनीच जबाबदारी झटकून विरोधी उमेदवाराला पाठिंबा दिला. त्यामुळे नाराज झालेल्या विमल ओंबळेंनी स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेत शिवसेनेचाच त्याग करून थेट राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधले.

महाबळेश्वरच्या नगराध्यक्षपदासाठी 7 उमेदवारांनी एकूण 9 अर्ज दाखल केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसने ऐनवेळी सुनील शिंदे यांचे नाव निश्चित केले. त्यामुळे नाराज होऊन नासीर मुलाणी यांनी बंडखोरी केली होती. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी महाबळेश्वरात येऊन मुलाणींची समजूत काढल्यानंतर त्यांनी अर्ज मागे घेतला. आता नगराध्यक्षपदाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील शिंदे, लोकमित्र जनसेवा आघाडीचे डी. एम. बावळेकर, कुमार शिंदे, सतीश साळुंखे आणि संजय पाटील यांच्यात होणार आहे.

## शालेय विद्यार्थ्यांसाठी लवकरच एसटीची हेल्पलाईन : मंत्री सरनाईक यांची घोषणा



**मुंबई** : राज्यातील शालेय विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या सुरक्षित आणि वेळेवर एसटी प्रवासाचा प्रश्न गंभीर होत चालला असताना, परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मोठा निर्णय जाहीर केला आहे. लवकरच संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी एसटीची विशेष हेल्पलाईन सुरू करण्यात येणार आहे. ही हेल्पलाईन विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्याच्या प्रवासात कोणतीही अडचण आल्यास तात्काळ मदत मिळावी या उद्देशाने तयार करण्यात येणार आहे. धाराशिव बसस्थानकाला दिलेल्या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बस उशिराने येणे, अचानक रद्द होणे आणि थांब्यावर न थांबण्याच्या तक्रारी थेट मंत्र्यांसमोर मांडल्या. या समस्यांवर तातडीने तोडगा काढण्याची ग्वाही सरनाईक यांनी यावेळी दिली.

राज्यातील अनेक दुर्गम आणि आदिवासीबहुल भागांत सरकारने मानव विकास बसेस विद्यार्थिनींच्या सुरक्षित प्रवासासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र, या बसेसचा वापर काही ठिकाणी इतर प्रवासी वाहतुकीसाठी केला जात असल्याच्या तक्रारीही मंत्र्यांच्या निदर्शनास आल्या. विद्यार्थीनींना सुरक्षित प्रवास उपलब्ध व्हावा यासाठी या बसेसचा केवळ शालेय वापरच व्हावा, अशा सक्त सूचना आधीच दिल्या आहेत. तरीही काही आगारांत या नियमाकडे दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले.

विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीत बस वेळेवर न सुटल्याने किंवा रद्द झाल्याने शाळेत उशीर होतो, तास बुडतात, तर कधी संध्याकाळी घरी पोहोचायलाच खूप उशीर होतो. त्यामुळे पालकांच्या ओरडालाही त्यांना सामोरे जावे लागते. गैरसमजातून काही विद्यार्थिनींनी आत्महत्याही केल्याची गंभीर उदाहरणे समोर आल्याने मंत्री सरनाईक यांनी या विषयाला अत्यंत गांभीर्याने घेतले आहे.

लवकरच सुरू होणाऱ्या या हेल्पलाईनद्वारे विद्यार्थ्यांना अचानक बस रद्द झाल्यास, तांत्रिक बिघाडामुळे बस बंद पडल्यास किंवा बस वेळेत न आल्यास थेट मदत मिळणार आहे. राज्यातील सर्व ३१ विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक शाळा आणि महाविद्यालयांना देण्यात येणार आहेत. अशा वेळी शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य किंवा थेट विद्यार्थीही विभाग नियंत्रकांशी संपर्क साधून तातडीचा तोडगा मागू शकतील. ही सेवा उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवासातील असुरक्षितता आणि दिरंगाईचा त्रास कमी होईल, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी आता थेट प्रशासनावर

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी आता थेट एसटीच्या स्थानिक प्रशासनावर टाकण्यात आली आहे. बसेस उशिरा सुटल्याने किंवा रद्द झाल्याने जर विद्यार्थ्यांचे तास चुकले, ते परीक्षेला उशीर झाला किंवा एखादी परीक्षा बुडाली, तर त्यासाठी संबंधित आगार व्यवस्थापक आणि पर्यवेक्षक जबाबदार धरले जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीचे जितके दिवस, तितके दिवस संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणे किंवा सक्तीची रजा देणे, अशा कठोर कारवाईचे आदेशही सरनाईक यांनी दिले आहेत. त्यामुळे एसटी प्रशासनावर शालेय बस फेऱ्या वेळेत आणि नियमितपणे चालवण्याची जबाबदारी आणखी कडक झाली आहे.

जाण्या–येण्याचा प्रवास अधिक सुरक्षित

एसटी सेवा ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागांत विद्यार्थ्यांसाठी जीवनवाहिनीच ठरते. त्यामुळे प्रवासात येणाऱ्या समस्या दूर करणे अत्यावश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत एसटी व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध व जबाबदार होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. हेल्पलाईन सेवेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना तातडीची मदत मिळणे अधिक सुलभ होईल, तसेच शाळेत जाण्या–येण्याचा प्रवास अधिक सुरक्षित आणि विश्वसनीय बनवणे हेच उद्दिष्ट असल्याचे सरनाईक यांनी नमूद केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ नोव्हेंबर २०२५


## करंजखेड येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा संवाद दौरा



**कन्नड (अरुण थोरात):** उमेदवार हा दुसरा तिसरा कोणी नसून मशालच उमेदवार आहे व मशाल चिन्ह घेऊन मतदारापर्यंत जा विजय निश्चितच आपला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष सर्वसामान्य व शेतकऱ्यांच्या हितासाठी व उज्वल भविष्यासाठी कटिबंध्द आहे. करंजखेड जिल्हा परिषद गटातून प्रकाश गाडेकर हे इच्छुक असून प्रकाश गाडेकर हे माझे जुने मित्र असून त्यांचा स्वभाव हा शिवसेनेचा आहे.शिवसेनेतच असे धडक बेधडक लोक तयार झालेले आहेत.जे आहे ते मागे न बोलता तोंडावर बोलण्याची सवय, रोखठोक बोलण्याची सवय प्रकाश गाडेकर यांच्यामध्ये आहे. लोकांसाठी व लोकांमध्ये राहून काम करणारा प्रकाश गाडेकर आहे.स्वतःचा नाही तर मतदारांचा,कार्यकर्त्यांचा विचार करणारा प्रकाश गाडेकर आहे. आज अनौपचारिक प्रवेश त्यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात झालेला असून नगरपालिका निवडणुकीनंतर मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांच्या हस्ते नक्कीच पक्षप्रवेश करू असे प्रतिपादन माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले. ते करंजखेड येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आयोजित संवाद दौऱ्यात बोलत होते. यावेळी उपस्थित माजी आमदार उदयसिंह राजपूत यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले की, प्रकाश गाडेकर यांचा स्वभाव हा रोखठोक असून लोकांमध्ये मिसळून लोकांसाठी काम करण्याची सवय प्रकाश गाडेकर यांना आहे. स्वतःचा नाही तर दुसऱ्याचा विचार करणारा असा नेता प्रकाश गाडेकर आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मशाल हे चिन्ह घेऊन मतदारापर्यंत जाऊन जास्तीत जास्त आपल्या पक्षाचे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला. यावेळी शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख बाबासाहेब मोहिते, तालुकाप्रमुख संजय मोटे, शिवसेना महिला आघाडीच्या सरपंच रूपाली मोहिते, करंजखेड गावाचे माजी सरपंच हय्यास सय्यद, उपतालुकाप्रमुख संजय राजपुत, मेघश्याम शेठ तायडे, विठ्ठल मनगटे, विभाग प्रमुख अनिल चव्हाण, उपविभाग प्रमुख बाबुराव सोनवणे, नाना येवले, रामेश्वर ताजने, अंबादास जाधव, आप्पा बोराडे, योगेश जंजाळ, विलास निकम, नाशिकराव काळे, शिवाजी नागोडे, कृष्णा सहाने, एकलव्य संघटनेचे मराठवाडा प्रमुख रमेश माळी, एकनाथ मोरे, चिमणापूरचे सरपंच परमेश्वर सोळुंके, माजी सरपंच रवींद्र ढोणे, आप्पासाहेब देशमुख, नामदेव अहिरे, रोहिदास ढोणे, ग्रामपंचायत सदस्य रत्नाकर जाधव, ममराज पवार, सचिन जाधव, सागर मातेरे, नथ्थु गांगड, मुजाहिद खान, परवेज खान, जावेद शेख, ओंकार पवार, पुनमचंद पवार, रामचंद्र चव्हाण, नितीन राठोड, गोकुळ सोळुंके, विलास मोटे, अनिल सपकाळ, सौरभ ढोणे, विनोद सोळुंके, अतुल सोळुंके, यांच्यासह शिवसेना पदाधिकारी,शिवसैनिक व करंजखेड परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## तिफण राज्यस्तरीय वाङ्मयीन पुरस्कार जाहीर





डॉ. मंदा नांदुरकर





माणिक पुरी





रमेश चिल्ले

**कन्नड :** कन्नड येथून गेली १७ वर्षापासून सातत्याने प्रसिद्ध होणारे भाषा, साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण व तिफण वाचक चळवळ यांच्या वतीने २०२४ - २०२५ या वर्षातील साहित्यकृतींना देण्यात येणारे तिफण राज्यस्तरीय वाङ्मयीन पुरस्कारासाठी विविध वाङ्मय प्रकारातील पुस्तके मागविण्यात आली होती. सदरील पुरस्कार जाहीर करण्यात येत आहे.ना. धो.महानोर तिफण काव्य पुरस्कार - रमेश चिल्ले, लातुर (पाणीबाणी नंतरच्या कविता ), रा. रं. बोराडे तिफण कादंबरी पुरस्कार - अरुण नवले, सोलापूर ( जागल ), लोकशाहीर - साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे तिफण कथा लेखन पुरस्कार - अलकनंदा आंधळे - घुगे ( अर्धा कोयता ), यशवंतराव चव्हाण तिफण चरित्र - आत्मचरित्र पुरस्कार - प्रा. केशव वसेकर (वसा केशवांचा ), महात्मा फुले तिफण नाटयलेखन पुरस्कार - चुडाराम बल्हारपुरे, गडचिरोली - गोंडवनाचा महायोद्धा क्रांतिविर बाबुराव शेडमाके, तिफण ललितलेखन पुरस्कार - माणिक पुरी, परभणी ( तळे, पक्षी आणि माळरान )(डॉ. वासुदेव मुलाटे तिफण समीक्षा - संपादन पुरस्कार - डॉ. वैशाली गुंजेकर, कोल्हापूर ( साठोत्तरी प्रवासवर्णने : वाटा आणि वळणे ), सानेगुरुजी तिफण बालसाहित्य पुरस्कार - डॉ. मंदा नांदुरकर , अमरावती ( फुलकई ), यांची निवड करण्यात आली आहे. राज्यभरातून या पुरस्कारासाठी पुस्तके प्राप्त झाली होती. त्यातून ही निवड करण्यात आली आहे. एका विशेष कार्यक्रमात हे पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल अशी माहिती तिफण त्रैमासिकाचे संपादक पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष तथा संयोजक प्रा. डॉ. शिवाजी हुसे, प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, प्रा. डॉ. दिलीप बिरुटे,प्रा. डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. सुधाकर जाधव, यांनी दिली आहे.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.



**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ नोव्हेंबर २०२५


## विद्यार्थ्यांनी स्व-कौशल्य विकसित करावीत : प्राचार्य डॉ. संजय अस्वले



**उमरगा :** (दि.21) सध्याच्या बदलत्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीत विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता, स्वतःची स्व- कौशल्य विकसित करून रोजगाराच्या संधी स्वतःच निर्माण कराव्यात असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी करिअर कट्टा उपक्रमा अंतर्गत RAC लॅब तर्फे 06 महिन्याचा कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात बोलताना केले.

आय.सी.आय.सी.आय. बँकेतर्फे देण्यात आलेल्या रेफ्रिजरेटर ,एसी व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या दुरुस्तीचा कोर्स महाविद्यालयात चालवला जातो व यासाठी स्वतंत्र लॅब विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या कोर्स करिता जवळपास पंधरा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व त्यांनी आपले सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले .त्याबद्दल करिअर कट्टा अभ्यासिकेमध्ये प्रमाणपत्राचे वितरण प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांनी उपजीविकेसाठी स्व-कौशल्यानुसार कोणते नवीन पर्याय निवडले जाऊ शकतात याचा विचार करायला हवा. हे करत असताना त्यांनी स्वतःकडे आपला 'बी' प्लान पण तयार ठेवावा जेणेकरून भविष्यातील येणारी आव्हाने त्यांना सहजपणे पेलता येतील.

सहभागी विद्यार्थी कू. गुरव सुप्रभा, कु. ढोणे अनिषा, कु. वारद विजयालक्ष्मी, कु. अनुराधा सोनटक्के, कु. अंकिता बाचके, कु. पांचाळ भाग्यश्री, गौरी मुळे, कु.वैशाली भोसले, कु. श्रुती बिराजदार , कु. तळीखेडे नंदिनी,मठपती धनेश, खान मसरुद्दीन, पोद्दार प्रणव, निलेश पवार, आणि सैफ वाजीद सय्यद अश्या एकूण पंधरा विद्यार्थ्यांना श्री. रोहित पालापुरे यांनी ट्रेनर म्हणून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी आय. क्यू.एस.सी. समन्वयक प्रा.डॉ. व्हि.डि. देवरकर, एन.सी.सी. कॅप्टन डी.एस.चिट्टमपले, श्री.औरदे सर व करियर कट्ट्यातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. करे सी . डी. यांनी तर आभार श्री सुभाष पालापुरे यांनी मानले.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.


## डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे संविधान महोत्सवाचे उदघाटन थाटात संपन्न




**नागपूर (चंद्रशेखर पाटील) :** "मी प्रथम भारतीय हीच भारतीय संविधाना ची प्रमुख ओळख आणि आधारशीला"- जेष्ठ समीक्षक व विचार वंत प्रा. देविदास घोडेस्वार "मी प्रथम भारतीय" हीच भारतीय संविधानाची खरी ओळख आणि आधारशीला आहे. सध्यस्थितीत भारतीय संविधानाची प्रातिनिधिक लोकशाही ही ओळख हरविलेली आहे. भारतीय संविधानाची उद्देशीका ही पूर्व ग्रह दूषित नवीन राष्ट्र निर्मितीची पायाभरणी आहे. कोणताही राजकीय नेता हा सत्ता कांक्षि असतो तो कधीच संविधान कांक्षी नसतो त्यामुळे संविधान नैतिकता लोकांमध्ये रुजवण्याची आज खरी गरज आहे.

गेल्या 75 वर्षात आजच्या वर्तमान परिस्थितीत संविधानिक प्रतिनिधी हे शासक बनले आहेत ही राष्ट्रासाठी आणि नागरिकांसाठी चिंताजनक आणि तेवढीच चिंतनशील बाब आहे. असे परखड विचार जेष्ठ समीक्षक आणि संविधानाचे भाष्यकार प्रा. देविदास घोडेस्वार यांनी मांडले. त्यासोबत भारतीय संविधानाची निर्मिती ते संविधानाची फलश्रुती हा ऐतिहासिक प्रवास आपल्या अभ्यास पूर्ण शैलीतून उलगडून सांगितला. ते स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड येथे आयोजित संविधान अमृत महोत्सवाचे प्रमुख उदघाटक म्हणून बोलत होते.

या प्रसंगी समीक्षक, जेष्ठ भाष्यकार व आंबेडकरी विचार वंत प्रा. देविदास घोडेस्वार यांचा महाविद्यालयातर्फे शाल आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या उदघाटन समारंभाचे अध्यक्ष पद कार्यकारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी भूषविले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्री. मोहन वासनिक आणि सचिव श्री. मनोज वासनिक यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी उप प्राचार्या प्रा. गामिनी मेश्राम, वरिष्ठ महाविद्यालय सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील. प्रा. सरोज वट्टे, कनिष्ठ महाविद्यालय सांस्कृतिक विभाग प्रमुख यांची विशेष उपस्थिती होती..

याप्रसंगी संविधान हा भारताचा एक सार्वभौम राष्ट्र म्हणून संचालन करणारा महत्वाचा दस्तऐवज आणि सर्वोच्च कायदा आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान गांभीर्य पूर्वक समजून घ्यावे यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. नव्हे ही आजच्या युवकांची खरी नैतिक जवाबदारी आहे. असे अध्यक्षीय विचार महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्य डॉ. प्रज्ञा बागडे यांनी व्यक्त केले. 22 नोव्हेंबर ते 28 नोव्हेंबर 2025 पर्यंत चालणाऱ्या या सात दिवसीय संविधान महोत्सवा मध्ये मान्यवरांची विविध विषयावर भाष्य करणारी व्याख्यान सत्रे, विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, भित्ती चित्र स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि संविधान जागर मंच रचित पथनाट्याचे सादरीकरण अशा विविध बौद्धिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचा समारोप क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्य तिथी पर्वावर 28 नोव्हेंबर ला होत आहे.

उदघाटन सत्रात महाविद्यालयात संविधान महोत्सव आयोजनामागची प्रमुख भूमिका संविधान महोत्सव समितीचे समन्वयक व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी मांडली तसेच वक्त्यांचा परिचय सभागृहास करून दिला. संगीत विभागाच्या वतीने प्रा. प्रज्ञा कोचे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती कृतज्ञ भाव व्यक्त करणारे "भारतीय घटनेचा तू शिल्पकार आहे" हे सुमधुर अर्पण गीत सादर केले. उदघाटन सत्राची सुरुवात संविधानाच्या उद्देशीकेचे वाचन करून करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उद्देशीकेचे वाचन डॉ. सुशांत चिमणकर यांनी केले. उपस्थितांचे आणि मान्यवरांचे आभार डॉ. कमलाकर तागडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ. विमल राठोड,डॉ. कमलाकर तागडे, डॉ. महेंद्र गायकवाड, डॉ. अमोल दि. मेंढे, डॉ. सुमेध नागदेवे, डॉ. सुदेश भोवते आणि संविधान समितीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाकरिता वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी आणि विद्यार्थी यांनी बहू संख्येने उपस्थिती दर्शविली. महाविद्यालयाच्या परंपरे नुसार कार्य क्रमाची सांगता राष्ट्र गीताने करण्यात आली.

## "अंगत पंगत" बाल कवितासंग्रहाचे थाटात प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर :- ( प्रतिनिधी )** प्रसिद्ध बालकवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा अतिशय दर्जेदार व बालकांच्या भावविश्वाला आनंद देणारा " अंगत पंगत " या बालकवितासंग्रहाचे नुकतेच प्रकाशन कार्यक्रमाचे अध्यक्ष व भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे अध्यक्ष तथा डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. सर्जेराव जिगे तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भाषा साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे कार्याध्यक्ष तथा डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ अभ्यास मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. शिवाजी हुसे तसेच भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद छत्रपती संभाजीनगरचे सचिव श्री. सुनील डोके यांच्या हस्ते थाटात प्रकाशन करण्यात आले.

हा प्रकाशन सोहळा छत्रपती संभाजीनगर येथील राणाजी हॉल सिडको एन- ८ येथे शाखा पुर्नरचना तसेच भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेच्या बैठकीत पार पडला. यावेळी व्यासपीठावर डॉ. प्रमोद कुमावत, डॉ. दैवत सावंत, कवी मनोज खुटे, अशोक शेवगण, माधुरी चौधरी, ज्योती सोनवणे हे प्रकाशन करतांना हजर होते तर प्रकाशन सोहळ्याच्या कार्यक्रमाला शिक्षक गिरीष जोशी, संदीप ढाकणे, डॉ. हबीब भंडारे, कवी पंजाबराव मोरे, प्रा.डॉ. अर्चना सोनवणे,तसेच उपक्रमशिल शिक्षिका श्रीमती कस्तुरी कुलकर्णी -जोशी, आणि बिडकीन येथील मुदस्सीर पठाण, खालेद चाऊस यांच्यासह बैठकीतील अन्य मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ नोव्हेंबर २०२५










## ऊन सावलीच्या शोधात:-भोगलेल्या दुष्काळाची सशक्त कहाणी




ख्यातनाम कांदबरीकार, कथाकार बा.बा.कोटूंबे यांची बहात्तरच्या दुष्काळाच्या खरीमुरीची गोष्ट.लेखक कळत्या वयाचे.उमज,समज आलेले.संपूर्ण मराठवाडा दुष्काळाने होरपळून निघाला होता.या होरपळीचे दिवस ज्यांनी अनुभवले ते त्यांचे करपलेल्या काळजाचे पान होते.बहात्तराचा दुष्काळ संपुर्ण महाराष्ट्रात होताच पण मराठवाडा जास्त होरपळून निघाला.बराशी,वळणं नालाबल्डींग,निलू व जवगहू,सुगडी,बर्बडा खाऊन लोकंजगत होती.सारं खल्डून लोकं बराशी खंदायला जातं व्हते.कितीबी मालदार असला तरी ज्यो सालदार झाला व्हता.रोजंनदारीवर लेबर म्हणून लोक जीवाच्या वर काम करीत व्हती.रानूमाळ गावखूरी हे सरकारी काम निघाली व्हती.पोटभरण्यासाठी लोक गाव सोडून शहराकडे नावं घेऊ लागलं अर्धे वर्धे लोकं चिंगाट पायपोळत मुम्बईला गेले.पोटाखळगी भरन्यासाठी लोकं मौताज झाले.हरेक घरातली बया माणसं बराशी खंदायला जाऊ लागले.तवापुनच राशन दुकानं उघडले.राशनवर हब्रेट, ज्वारी, तांदूळ,गुळ,
सुगडी,पामतेल,घास्लेट,रा◌ॅकेल राशन कार्डवर भेटु लागलं.गावच्या गावं वसं पल्डे.गुरंढोरं विकूनटाकले.जितराब जगावं कसे? कारणं पाऊसच पल्डा नाही.तेव्हा सरकारी विहीरी खोदण्यात आल्या जमिनीच्या पोटात तिस परसावर ही पाणी लागतं नव्हतं.लागलचं तरं सांगळ्यावर पाणी येतं होतं.डबडे डुबडे खोंगभर पाण्यासाठी रानोमाळ हिंडावं लागतं व्हतं.पाण्याची बोंबाबोंब झाली तवा सरकारांनी ट्रंक्कर सुरू केले.चारा पाणी संपला तवा सरकारी चारा तगाई आली.गाईगुरंजितरांब चारा पाण्यावाचून तडफडून मेली.माणसं देशोधडीला लागली.पितळी भांडेकुंडे,जर्मनचे ताट विकून लोकं उपजिवीका करीत होती.सोनं, नाणं काहीचं राहिलं नाही.म्हणून पोटासाठी जीवाची ममई करायची म्हणून गावं सोडली.असा हा १९७२चा माणूसमाऱ्या दुष्काळ म्हणजे'उन्ह सावलीच्या शोधत'ही कांदबरी मनाचा ठाव घेते.अतिशय दारुन पराभव या दुष्काळाने,गावं भेसूर झाली होती.मराठवाड्यातील जनतेला दाखवून दिला.याचे साक्षात दर्शन या कांदबरीतून घडते.या कांदबरीचा पट म्हणजे निजामकालीन जी मराठवाडी गावखेडे होते.भारताची पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी अमेरिकेतून नीलो ज्वारी व जवगहू सुगडी या भूक भागविण्यासाठी मागवल्या होत्या.मराठवाड्याचा भाग जसे नांदेड परभणी,हिंगोली उदगीर, जालना औरंगाबाद सेलू मंठा परतूर भोकरदन अंबड तालुक्यातील सर्व गावखेडे.विठोबा पखालीनं पाणी देयाचा.गावात मस्टर कारकुन,सावरगाव आणि परिसर या गोदावरी पट्यातील गावं होरपळून निघाली होती.या कांदबरीत लेखकाच्या गावातील गावगाडा ते तत्कालीन म्हातारी माणसं याच्या दमदार जगण्याचा अनुबंध हा मुख्य धागा पकडून ही कांदबरी मध्य गाभा सांभाळीत तत्कालीन परिस्थिती ही अत्यंत बिकट होती.आता कथा सुत्र हे अतिशय दमदार आहे.चारा पाणी जनावरांना नाही म्हणून दावणीच्या दावणी मातीमोल झाल्या उन्हाच्या काहलीने अन् उपासमारीने लोकं चक्कर येऊन मरून पडत होते.गावोगावी खडीचे काम सुरू झालते.हजरीवररोजंदारी होती.माय मावल्या कडेवर लेकरू घेऊन कामावर जात होत्या.व्यकुंची बायको संगीत तिच्यावर वाईट नजर ठेवून मुकादम तिला त्रास देतं होता.लोकं पाऊस पडलं म्हणून वाट पाहत होते.अन्न धान्य संपलं होतं.बहात्तरचा दु:ख दुष्काळ कांदबरीचे कथानक अतिशय भंयकर आहे.संगीता तिचा नवरा व्यंकू दोनं नादनं लेकरं.व्यंकू विहिरीच्या बार द्यायच्या कामावर होता.एक दिवस बारं उडाला.पळतांना मला मोठा दगड पायावर येऊन पडला पायचा भूगा झाला.दवाखान्यात पाय तोडून काढवा लागला.मालकानं या मोबदल्यात शंभर रुपये अन् दोनपायल्या ज्वारीवर बोळवण केली.संगीता मदत मागायला गेली तेंव्हा "तुह्या नवऱ्याला म्या जन्मभर संभाळू का?". दुष्काळानं भंयकर रुप धारण केले.संगीता एकटीच खडी कामावर काम मागायला गेली.तेंव्हा माणूस पाहिजे.तुकाराम,सलीम,यांनी विनंती केली.मस्टर कारकुनाने तिला पाणी वाटपाचं काम दिलं.संगीता लेकरं झाड सावलीत ठेवून रानोमाळ फिरनं लेबरसाठी घागरीनं पाणी देण्याची.एकदा लांब सडकाच्या पलीकडं संगीताला तिकडच्या विहीरीवरून पाणी आन म्हणून पाठीवलं.तिकडं जाऊन कारकुनानं संगीवर अतिप्रसंग केला..हा दुष्काळाचा भंयकर सखेद भेदक चित्रण या कांदबरीत आले आहे.लहाग्या मुलीला साप चावतो, सावरगावच्या दवाखान्यात घेऊन जाता.मुलगी मरते,सलीम म्हणतो,"खुदा ऐसा कैसा कर सकता है? क्या देखा है ओ बच्चीने?ऐसाही करना था तो पेदाही क्यु किया?सबके सामने उठाके रे गया!बच्ची चेहरा सामने से हिलरा नहीं!(पृष्ठ ७८) सारं गावं हळहळलं,दुखवटा म्हणून भाकर तुकडा अनुन दिला.पुन्हा दु:ख दाबून लोकं कामाला लागली.ज्या बाईचं नख दिसतं नव्हतं.ती बाईपण रोजगार हमीच्या,खडी फोडायच्या,विहीरीच्या कामाला येऊ लागली.पडीतात वाळून गेलाला बर्बडा ज्याला ढोरं खातं नव्हती ती उपटून कुटून ज्वारीत दळून खातं व्हती.गावशिवारात लोकांनी बरबडा ठुला नाही.या कांदबरीत बा बा कोटंबे यांनी अतिशय निस्सीम भक्तीने जगल्या भोगल्याची काटेरी वेदना समर्थपणे मांडली आहे.बहात्तरच्या तत्कालीन परिस्थिती सर्वहरा समाजातील लोकांनी शहरवस्ती धरली.डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतून दलित पँथरचे कार्यकर्ते गावात येतात आणि मरीआई,पोतराज,केस वाढवणे, कोंबडे,बकरे,मुक्या जीवाचा बळी देणे अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी या परंपरा आता नष्ट केल्या पाहिजे.दुष्काळाने आगोदरच होरपळून निघालेला हा समाज. "डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आमच्या समाजात रुजवण्यासाठी आम्ही काम करत आहोत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या साक्षीने आम्ही बौध्द धर्म स्वीकारला आणि धर्माला हिंसा मान्य नाही हे आम्ही खेडोपाडी जाऊन सांगतोय"(पृष्ठ ११५) हा अत्यंत वास्तववादी चिंतन चिकित्सक या कांदबरी आहे.तुकाराम दामु,सलीम,रोहिदास,वामन, यांच्या मनाच्या कथा शेवटी मन पिळवटून टाकतात.मुलं मोठी झाली पोरींचे लग्न झाले.दौलतराव सावरकरांनी लय जनाच्या मुंड्या मोडल्या.तेचं जळत सरणं पाऊस पुराणी वाहुन गेलं.एका वढ्याच्या बाभळीच्या मुळ्यात अडकलं.पोरानं पुन्हा तुराठ्या जळतन आनुन जाळलं.दौलतरावाच्या पोरांनी गहाण ठेवलेल्या जमीनी गावातल्या हिसाबांन इमानदारीन परत केल्या.वैजीनाथचं पोरगं जालन्यात हापीस झालं.रोहिदासच्या पोरांनी पुण्याला कामाला लागलं.दामुचं पोरगं परभणी, नांदेड येथं राह्यलं गेलं.गावात ऐकणं मुसलमानचं घरं सलीमचं पोरगं परभणी येतं रिक्षा चालवतं.ही एकोप्याने राहणारी जीवाभावाची गाव माणसं जीवाला जीव लावणारी सलीमला घेऊन जाण्यासाठी जेव्हा तेच पोरंग येतं तेंव्हा तुकारामाची बायको अन् सलीमची बायको एकमेकीच्या गळ्यात पडून रडतात.सलीम त्याची बायको रिक्षात बसून गावं सोडून जाताना घराची चावी तुकारामकडे देतो..दुष्काळाने होरपळून निघालेली ही माणसं आता राहिली नाही.व्यंकूची बायको संगीता एकदिवस तिच्या सोबत घडलेला प्रसंग सांगून टाकते.तो तिला माफ करतो.शेवट सारेच गावं बदलतं जाते.जुन्या माणसांच्या जखमा कायमचं त्यांच्या मनमस्तिकात आहे.बा.बा.कोटूंबे यांनी कांदबरीच्या निमित्ताने हा मराठवाड्याच्या दुष्काळाचा दस्तावेज ठेवला आहे.साहित्यअकादमी पुरस्कार प्राप्त कथाकार कादंबरीकार डॉ आसाराम लोमटे पाठराखण लिहितात,"१९७२च्या दुष्काळाचे साहित्यातील चित्रण अपवादात्मक आहे.या कादंबरीने ही उणीव भरून काढली आहे.दुष्काळानंतरचे गावाचे स्थित्यंतर आणि उसवलेली वीण या कांदबरीत प्रकर्षाने दिसून येते.त्याच बरोबर दुष्काळानंतर आलेले संकरित बियाणे, गावं खेड्यातल्या जुनाट सामाजिक रूढी परंपराविरूध उदयला आलेली जागृती, रोजगारासाठी गावातल्या माणसांचे होणारे विस्थापन असे काही बदल ही या कादंबरीतून दिसून येतात.कांदबरीची वाचनीयता वाचकाला खिळवून ठेवते.कुठेही भडकपणा नसलेली आणि सयंत असा आशय मोजक्या शब्दात मांडणारी कांदबरी वाचकांना नक्कीच आवडेल " ग्रामीण विश्वाचे आशय संपन्न रेखाटने सरदार जाधव यांनी केले आहे.'ऊन्हानंच सावली माघावी इतका भंयकर कल्लोळाचा दुष्काळ'.माणसाच्या जगण्याच्या खळगीला सावली भेटतं नव्हती.पण माणसांत माणुसकी होती.बा.बा. कोटूंबे यांना शुभेच्छा.

ऊन सावलीच्या शोधात:-(कांदबरी)
लेखक:-बा. बा. कोटंबे
प्रकाशक:-सुनीताराजे पवार, संस्कृती प्रकाशन.पुणे प्रथम आवृत्ती:-१५ ऑगष्ट २०२५
मुखपृष्ठ:-सरदार जाधव
मुल्या-२५०रूपये




**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,**
जालना
संपर्क:-९९७५१३७३३७


## एक होता भोपळा

एक होता भोपळा
त्याला लागला खोकला

तिकडून आलं गाजर
त्यांने दिलं पाणी

वांग म्हटलं आपण
गाऊ गोड गोड गाणी

एक होती भेंडी
तिला आली शेंडी

मेथी तिच्यावर हसली
म्हणून भेंडी रुसली

आलं डांगर तिकडून
मेथी गेली सटकून

डांगर म्हंटलं मेथीला
का हसली भेंडीला

पहिली झाली होती
भेंडी अन् मेथीची कट्टी

आता डांगरामुळे झाली
पुन्हा दोघींची बट्टी


**कु. कीर्ती ज्ञानेश्वर गायके**
वर्ग ९ वा
शाळा - मदर गंगा इंग्लिश
स्कूल, कन्नड
जिल्हा छत्रपती संभाजीनगर
मो. ९४९३३८४८८९


## थंडीच थंडी

इकडे तिकडे
थंडीच थंडी
घालू आता
उलनची बंडी

थंडीत येतो
भारी कंटाळा
नको वाटते
सकाळची शाळा

कानावर सजे
छानशी कानटोपी
गोधडी पांघरूण
जावू झोपी

कधी संपणार
थंडीची लाट
पाहू आता
उन्हाची वाट

सूर्याला पाहून
जाईल ती पळून
घाबरत घाबरत
पाहील वळून




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ नोव्हेंबर २०२५


## आज अचलबेट येथे अभंगाला वाहिलेले पहिले वाहिले राज्यस्तरीय साहित्य संमेलन



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील प्रसिद्ध अशा श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान,तुरोरी_कराळी येथील निसर्गरम्य आणि भव्य डोंगरावर राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरचे संत साहित्यातील अभंग या काव्यप्रकाराला वाहिलेले पहिलेच भव्य दिव्य अशा प्रकाराचे आगळे वेगळे एकदिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.साहित्य हा समाजाचा आरसा आहे.समाजाचे प्रतिबिंब त्यात पडत असते.तसेच साहित्याच्या प्रतिबिंबतून समाजात परिवर्तन घडत असते. संतानी त्याकाळात अभंग ही पदरचना अत्यंत प्रभावी पद्धतीने मांडली.ती लोकाभिमुख केली. आजही संताचे अभंग सर्वसामान्य माणसांना तोंडपाठ आहेत. ही अभंग रचना वर्तमान कालीन साहित्यातून लुप्त होत चालली आहे. नष्ट होत जाणाऱ्या या साहित्यप्रकाराला काव्यप्रेमी महाराष्ट्र समूहाच्या वतीने आणि समाज विकास संस्थेचे भूमिपुत्र वाघ यांच्या पुढाकाराने पुन्हा एकदा नवसंजीवनी देण्याचा हा आटोकाट प्रयत्न आहे.पुरोगामी महाराष्ट्रामध्ये साहित्याच्या संदर्भात विविध प्रकारची साहित्य संमेलने कुठे ना कुठे सतत होत राहतात. राष्ट्रीय पातळीवरचे फक्त आणि फक्त अभंगाला वाहिलेले हे पहिले साहित्य संमेलन ठरणार आहे,यात कांहीं संशय नाही.या साहित्य संमेलनाकडे सर्वांचे विशेष लक्ष लागून राहिले आहे.हे संमेलन आज दिनांक तेवीस नोव्हेंबर रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत चालणार आहे.महाराष्ट्रातील विशेष निमंत्रित कवी ,अभंगकर,कीर्तनकार या संमेलनाला हजेरी लावणार आहेत.या विशेष निमंत्रित अभंग कार, कवीना आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानित केले जाणार आहे.या अभंगवाणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन भूमिपुत्र वाघ यांचे धर्मगुरु ,महाराष्ट्र लोकविकास मंचचे अध्यक्ष मा .विश्वनाथ अण्णा तोडकर ह. भ. प.श्रीहरी लवटे गुरुजी,ह.भ.प.भीम महाराज,अनाथ गरिबांची माय विद्याताई वाघ,प्राचार्य व्यंकट अनिगुंठे ,प्राचार्य गोविंद बिराजदार,आदी विभूती राहणार आहेत.अशी माहिती संयोजक काव्यप्रेमी विकास राठोड,संपादक लक्ष्मण पवार ,सुनंदा भगत,सुधाकर झिंगाडे,कमलाकर भोसले,विकास गायकवाड आर्दीनी दिली आहे.या संमेलनाला निमंत्रित अभंग सादर करण्यासाठी सर्वश्री सुधाकर झिंगाडे,रत्नाकर पाटील,स्नेहा जाधव,दत्ता वालेकर,कमलाकर भोसले,श्रुती चौधरी,कान्हा खानसोले,खाजबाई बागवान,दर्शन जोशी,विकास राठोड,दत्तात्रय इंगळे,नागनाथ बडे, के.पी.बिराजदार,दत्ता काजळे,वैष्णवी कटारे,काकासाहेब कांबळे, रमा मन्नाडे,दत्तात्रय ठुबे,हणमंत सोनवणे,सुनंदा भगत,मधुबाला आवटे,रमेश हणमंते,अर्चना मानकर, द्न्यानेश माशाळकर, बाळासाहेब मगर,नागसेन ल.कांबळे,सरोज गायकवाड,स्नेहलता महिंद्रकर,गोविंद श्रीमंगल,स्नेहा शिंपी,धर्मराज बोलढाणे, मधूकर हुजरे,सुषमा कटारे,अशोक चव्हाण,रामचंद्र गुरव,कल्पना सुरवसे,वैशाली गायकवाड,सोनाली रसाळ,सुमन पवार,प्रियंका गायकवाड आदी साठ कवींना निमंत्रित करण्यात आले आहे.याशिवाय देशभरातून आणि राज्यभरातून या अभंग साहित्यसंमेलनाला लेखक, कवी , विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते येणार आहेत. साहित्याची मांदियाळी याची देही , याची डोळा पाहण्याची सुवर्णसंधी संयोजकांनी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे संयोजकांच्या वतीने जास्त रसिक श्रोत्यांनी या संमेलनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि सामाजिक वास्तव

आज संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारी आणि मानवी संवेदनांना प्रश्न विचारणारी सर्वात गंभीर घटना म्हणजे शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या. शाळेतील मुलांच्या हातात पेन, वही, स्वप्नं आणि भविष्य असावं; पण त्यांच्या हातात दोरी, ब्लेड किंवा आत्महत्येचे मार्ग येऊ लागले, ही केवळ व्यक्तिगत समस्या राहिलेली नाही, तर ती आपल्या शिक्षण पद्धतीचा, कुटुंबीय संस्कारांचा, डिजिटल युगातील स्पर्धेचा आणि समाजाच्या यंत्रणेचा परिणाम आहे. अलीकडे घडलेल्या अनेक आत्महत्यांच्या घटना, विशेषतः दिल्ली, पुणे, कोटा, वर्धा आणि इतर भागातील विद्यार्थ्यांच्या मृत्यूने संपूर्ण समाजाच्या मनावर प्रश्न निर्माण केला आहे की अखेर एवढं काय घडलं की एक निष्पाप विद्यार्थी स्वतःचं जीवन संपवण्याचा निर्णय घेतो? समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास विद्यार्थी आत्महत्या ही वैयक्तिक कमजोरी नसून सामाजिक दाब, सांस्कृतिक अपेक्षा, कौटुंबिक वातावरण, शालेय मूल्यांकन पद्धती आणि मानसिक आरोग्याविषयी असलेल्या अज्ञानाची संयुक्त निर्मिती आहे.आजच्या कुटुंब रचनांमध्ये मुलांची संख्या कमी झाल्याने “एकुलता एक” किंवा “लाडका-लाडकी” संस्कृती वाढली आहे. पालकांच्या नजरेत मुलं आता ‘निर्माण करायचे चारित्र्य’ नसून ‘गुंतवणुकीवर मिळणारा परतावा’ झाली आहेत. जेथे पालक स्वतःच्या अपूर्ण आकांक्षा, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक स्पर्धा मुलांच्या शिक्षणावर लादतात. त्यामुळे मुलांवर अपेक्षांचे ओझे वाढते. अनेक मुलांमध्ये ताण सहन करण्याची कौशल्ये विकसितच होत नाहीत. पूर्वीच्या संयुक्त कुटुंबात भावंडे, आजी-आजोबा, खेळ, शिक्षा, शिस्त आणि संवाद होते; आज मात्र घरात शांतता आहे पण मनांत आवाज आहेत, मोबाईल आहे पण संवाद नाही, महागडी शाळा आहेत पण भावनिक शिक्षण नाही. शिक्षा किंवा मर्यादा लावणे आता ‘मानसिक हिंसा’ समजली जाते आणि मुलांना अपयश किंवा नकार स्वीकारण्याची मानसिक सवयच राहत नाही.अलीकडच्या काळात शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनकपणे वाढताना दिसत आहे. शाळा म्हणजे ज्ञान, शिस्त, समविचारांची देवाणघेवाण आणि भविष्याचे घडते पाऊल असे आपण मानतो; परंतु जेव्हा हीच शाळा, हा शैक्षणिक प्रवास विद्यार्थ्यांसाठी जिवाभावाचा भार बनतो, तेव्हा समाजाची मूल्यव्यवस्था किती बदलली आहे हे प्रकर्षाने जाणवते. आत्महत्या ही केवळ वैयक्तिक निर्णय नसतो; तो एक सामाजिक संदेश असतो की कुठेतरी काही चुकले आहे, आणि गंभीरपणे चुकत आहे. शालेय वयातील विद्यार्थ्यांनी आत्महत्या करणे हे सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक आणि मानसिक आरोग्याच्या घटकांचे गुंतागुंतीचे मिश्रण आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून ही समस्या पाहिली तर या घटना केवळ काही दुःखद किस्से नाहीत, तर वाढत्या सामाजिक दडपणाचे प्रतिबिंब आहेत.आजचा विद्यार्थी कट्टर स्पर्धेच्या जगात जगत आहे. शाळा म्हणजे फक्त वर्ग, पुस्तके आणि परीक्षा नव्हे; ती स्पर्धेची रणभूमी झाली आहे जिथे पहिले येणारेच “यशस्वी” मानले जातात, बाकी सर्व “हरलेले” ठरविले जातात. विद्यार्थ्यांच्या भावनिक जगण्यापेक्षा त्यांच्या गुणपत्रिकेला अधिक प्रतिष्ठा दिली जाऊ लागली आहे. शिक्षकांची अपेक्षा, पालकांचे स्वप्न आणि समाजाचे मूल्यांकन या तिपेडी दडपणाखाली विद्यार्थी स्वतःचा वेगळा आवाज हरवून बसतात. मानसिक आरोग्याला अजूनही “नाजूकपणा” समजले जाते आणि मुलांवर होणारा भावनिक ताण अदृश्य राहतो. अशा परिस्थितीत जेव्हा विद्यार्थी मोठ्या भावनिक आव्हानांशी झुंजतात, तेव्हा त्यांना आधार, संवाद किंवा समजून घेणारा हात मिळत नाही आणि ते मौनात तुटू लागतात.कुटुंबव्यवस्था या समस्येत निर्णायक भूमिका बजावते. अणुकुटुंबामुळे संवाद आणि भावनिक सहजीवन कमी झाले आहे. पालकांच्या नोकऱ्या, व्यस्त दिनक्रम आणि तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेले दैनंदिन जीवन मुलांशी असणाऱ्या संवादाला बाधित करत आहे. अनेकवेळा मुलांचे “मी ठीक नाही”, “मला भीती वाटते”, “मला जमत नाही” हे संकेत पालकांच्या लक्षातही येत नाहीत. दुसरीकडे एकुलता एक किंवा कमी अपत्य असलेल्या कुटुंबांमध्ये मुलांवर अतिप्रेम, अतीसंरक्षण आणि त्याचबरोबर अवास्तव अपेक्षा यांचे अनोखे मिश्रण तयार झाले आहे. परिणामी, मुलांनी चुका करणे किंवा अपयश स्वीकारणे अशक्य झाले आहे. “तू कसं नाही करू शकत?”, “इतर मुलं करू शकतात मग तू का नाही?” या प्रश्नांपेक्षा त्यांना हवं असतं ते तुला “काय त्रास होतोय? मी आहे ना.”शाळांनी मुलांना फक्त ज्ञान देऊन चालणार नाही; त्यांना भावनिक स्थैर्य, ताणतणावांचे व्यवस्थापन, आत्मस्वीकृती आणि जीवनकौशल्ये शिकवणे अधिक आवश्यक आहे. परंतु शिक्षण पद्धतीत परीक्षांच्या, रँकिंगच्या आणि कामगिरीच्या आकड्यांना अधिक महत्त्व देण्यात येते. इथे विद्यार्थ्यांचे मानसिक जग समजून घेणारी, त्यांची भीती कमी करणारी आणि त्यांना मानवी मूल्ये शिकवणारी प्रणाली अद्याप रुजली नाही. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील नातेसंबंधही यांत्रिक झाले आहेत ते म्हणजे नाव, चेहरा आणि रोल नंबर एवढ्यापुरतेच. शालेय परिसरातील छळवाद, टोमणे, अपमान आणि शिक्षकांकडून होणारा ताण व ओरडणी हे अनेक विद्यार्थ्यांसाठी असह्य वास्तव बनते.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून जर या घटनांचा विचार केला, तर एमिल दुर्खाइमच्या ‘अनोळखी आत्महत्या’ (Anomic Suicide) या संकल्पनेशी त्यांची तुलना करता येते. जेव्हा समाजातील मूल्यव्यवस्थेत अचानक बदल होतात आणि व्यक्तीला त्यांच्याशी जुळवून घेता येत नाही, तेव्हा आत्महत्येचे प्रमाण वाढते. आजचा समाज यश, पैसा, स्पर्धा आणि प्रतिष्ठा या चार स्तंभांवर उभा आहे, जिथे करुणा, संवाद, शांतता, संवेदनशीलता आणि स्वीकार यांना कमी जागा मिळते. सोशल मीडियामुळे तुलना, अपूर्णतेची भावना, लोकप्रियता आणि "इतरांसारखे होण्याची" जबरदस्त इच्छा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम करत आहे. तंत्रज्ञानाने जग जवळ आणले पण हृदये दूर नेली आहेत.ही परिस्थिती बदलण्यासाठी कुटुंब, शाळा, समाज आणि शासन यांना एकत्रित प्रयत्न करावे लागतील. विद्यार्थ्यांना आत्महत्या हा मार्ग नसून त्यांच्यासाठी मदत उपलब्ध आहे, अशी जाणीव निर्माण होणे अत्यावश्यक आहे. शाळांमध्ये काउन्सेलिंग केंद्रे, मानसिक आरोग्य तज्ञ, हेल्पलाईन, "ओपन कन्वर्सेशन" तास, सहानुभूतीवर आधारित शिक्षण आणि ताण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. पालकांना मुलांशी भावनिक नातेसंबंध बांधण्याचे प्रशिक्षण देणे तितकेच महत्त्वाचे आहे. समाजाने गुणांवर आधारित मुलांचे मूल्यांकन करणे थांबवून त्यांची मूल्ये, आवडी, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व ओळखण्याची गरज आहे.शेवटी, प्रत्येक बालक हे अपूर्ण, वाढणारे, शिकणारे आणि चुका करणारे अस्तित्व आहे, विद्यार्थी हे प्रकल्प नसतात, ते जगणारे जीव असतात. आत्महत्येने संपणारी मुलांची स्वप्ने ही केवळ त्या मुलाची हानी नसून संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा मृत्यू आहे. आज आपण मुलांना शिकवतो कसे जिंकायचे, स्पर्धा कशी करायची, पण जीवन जगायचे कसे हे शिकवायला आपण विसरलो आहोत. जोपर्यंत हा विसर दूर होत नाही, तोपर्यंत या घटनांची सावली आपल्या भविष्यातील पिढीवर अंधार बनून राहील. कारण प्रश्न अजूनही तोच आहे की विद्यार्थी अभ्यासासाठी दबावाखाली आहेत की जगण्यासाठी?




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो. 9960103582

bagate.rajendra५@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ नोव्हेंबर २०२५

# समाजिक सौहार्द टिकवण्यासाठी घटना दुरुस्ती हाच एकमेव मार्ग - राजेंद्र दाते पाटील, माध्यमावर अयोग्य चर्चा



**प्रतिनिधी(मुंबई )**भारतीय राज्य घटनेतील अनुच्छेद 246 म्हणजे भारताच्या संविधानाची एक महत्त्वाची तरतूद आहे जो केंद्र आणि राज्य सरकारां च्या कायदे करण्याच्या कायदेशीर अधिकारांची व्याप्ती निश्चित करते परंतु इंद्रा सहानी प्रकारणा तील निर्देशां नुसार आरक्षण देऊ शकत नाही आणि म्हणुन समाजात समाजीक सौहार्द टिकवण्यासाठी घटना दुरुस्ती हाच एकमेव मार्ग असल्याचे मत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी वेळो वेळी स्पष्ट केले आहे.सदरच्या विषयावर बोलतांना पुढे ते म्हणाले की,या अनुच्छेदा नुसार तीन सुची मध्ये (संघ सुची, राज्य सुची आणि समवर्ती सुची) विषय वाटप केले आहे.संघसुची तील विषयांवर फक्त केंद्र सरकारला कायदे बनवण्याचा अधिकार आहे, राज्य सूचीतील विषयांवर राज्य सरकारला, आणि समवर्ती सूचीतील विषयां वर केंद्र व राज्य दोघांनाही कायदे बनवण्याचा अधिकार आहे.आरक्षणाचा विषय राज्य सरकार किंवा केंद्र सरकारने सामाजीक न्यायासाठी तसेच मागास वर्गांसाठी केलेल्या विशेष तरतुदींच्या अंतर्गत येतो, जो मुख्यतः संविधानाच्या अनुच्छेद १५, १६ या तरतुदींमध्ये आढळतो.

अनुच्छेद २४६ मध्ये आरक्षणा साठी थेट काही विशेष तरतूद नाही, परंतु आरक्षणाशी संबंधित कायदे केंद्र आणि राज्य यांच्या संबंधित सूचीमध्ये येणाऱ्या विषयांवर कायदा बनवू शकतात असेहीआरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट करतांना उदाहरणार्थ नमुद केले की सामाजिक न्याय,शासकीय नोकऱ्या, आणि शिक्षण क्षेत्रातील आरक्षणासाठी कायदे अनुच्छेद २४६ अंतर्गत राज्य सूची किंवा समवर्ती सूचीतील विषयां नुसार राज्य किंवा केंद्र सरकार बनवू शकते.पण आरक्षणाचाअधिकार आणि मर्यादा ( जसे की इंद्रा सहानी प्रकारणात एकूण आरक्षण ५०% पेक्षा अधिक होऊ नये याची इंद्रा सहानी प्रकारणात सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाने घालून दिलेली मर्यादा) हा संविधानाच्या इतर अनुच्छेदांनी आणि सुप्रीम कोर्टाच्या निर्णयांनी नियंत्रित केला आहे. थोडक्यात, अनुच्छेद २४६आरक्षण देण्याचा अधिकार किंवा त्याची मर्यादा ठरवत नाही,तो केंद्र व राज्य सरकारांना कोणत्या विषयांवर कायदे बनवण्याचा अधिकार आहे हे निश्चित करतोआणि म्हणुन आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी काही माध्यमांवर होत असलेली चर्चा केवळ मृगजळ असल्याचे स्पष्ट करून सवाल केला की, परिच्छेद २४६ प्रमाणे आरक्षण देता येते काय ?संविधानाचा अनुच्छेद २४६ संघ आणि राज्यांमध्ये कायदे करण्याची शक्ती विभागण्या बाबत आहे.मात्र,अनुच्छेद २४६ मध्ये आरक्षण संबंधित कोणतीही थेट तरतूद नाही. आरक्षणाचे प्रश्न साधारणपणे संविधाना च्या अनुच्छेद १५आणि अनुच्छेद १६ अंतर्गत येतात,जे भेदभाव प्रतिबंध आणि आरक्षण संबंधी तरतुदीं बाबत आहेत.

म्हणून आरक्षणाचा अधिकार थेट अनुच्छेद २४६अंतर्गत नसला तरी राज्य किंवा संसद कधी कायदे बनवू शकतात त्याचा संदर्भ अनुच्छेद२४६ मधून घेतला जातो. आरक्षण सरकारकडून समाजाच्या मागासलेल्या वर्गांना वंचित घटकांना देण्यात येते, आणि त्यासाठी अनुच्छेद १५(४) आणि अनुच्छेद १६(४) मध्ये तरतुदी आहेत.या संदर्भात आरक्षण करणे राज्य किंवा केंद्र सरकार च्या कायद्यां मार्फत होते परंतु अनुच्छेद २४६ फक्त कायदे करण्याच्या अधिकाराचा विभागणी करणारा प्रावधान आहे; आरक्षणाचा उल्लेख नाही.थोडक्यात, अनुच्छेद २४६ नुसार आरक्षण देऊ शकतात की नाही,या बाबत नाही तर त्यातून केंद्र आणि राज्य सरकारला कोणत्या क्षेत्रात कायदे करता येतात हे ठरते. आरक्षणाचा अधिकार व याची अंमल बजावणी इतर अनुच्छेदां खालील कायद्यांद्वारे होते अनुच्छेद २४६ ही भारताच्या संविधानाची एक महत्त्वाचा तरतूद आहे जी केंद्र आणि राज्य सरकारांच्या कायदे करण्याच्या कायदेशीर अधिकारांची व्याप्ती निश्चित करतो. २४६ प्रमाणेआरक्षण देता येईल काय? असा सवाल आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला व नमुद सुद्धा केले की, संविधानाचा अनुच्छेद २४६ मुख्यतः संसद आणि राज्य संस्थांच्या कायदेशीरअधिकारांचे विभाजन करतो. या अनुच्छेदा नुसार, संघ सूचीतील विषयांवर (जसे संरक्षण, परराष्ट्र, इत्यादी) फक्त संसदेला कायदे करण्याचा विशेष अधिकार आहे,राज्य सूचीतील विषयांवर केवळ राज्य विधायिकेचा विशेष अधिकार असतो; तर सहवर्ती सूचीत असलेल्या विषयांवर दोघांनाही कायदे करता येतात, पण मतभेदांमध्ये संसदेच्या कायद्यास प्राधान्य दिला जाते.आरक्षणाचा विषय सहवर्ती सूचीतील सामाजिक न्याय, आरक्षण वगैरेशी निगडित असल्यामुळे त्यावर राज्य आणि केंद्र दोघेही कायदे करू शकतात. मात्र, आरक्षणाच्या कायद्यांनी संविधानाच्या इतर अनुच्छेदांशी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांशी सुसंगत असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट प्रतिपादन पण आरक्षणाचा अधिकार आणि मर्यादा (जसे की एकूण आरक्षण 50% पेक्षा अधिक होऊ नये याची सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली मर्यादा) हा संविधानाच्या इतर अनुच्छेदांनी आणि सुप्रीम कोर्टाच्या निर्णयांनी नियंत्रित केला असल्याचे आरक्षणाचे जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले व थोडक्यात, अनुच्छेद 246 आरक्षण देण्याचा अधिकार किंवा त्याची मर्यादा ठरवत नाही; तो केंद्र व राज्य सरकारांना कोणत्या विषयांवर कायदे बनवण्याचा अधिकार आहे हे निश्चित करतो, ज्याद्वारे आरक्षणाचे कायदे बनतात आणि अमलात आणले जातात.

आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी अभ्यासु असे अत्यंत महत्वाचे विवेचन करतांना उदाहरण देतांना अगदी केशवानंद भारती प्रकरणा सारख्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निर्णयांमध्ये संविधानातील असे जाणिव पूर्वक समजले गेले आहे की काही मूलभूत अधिकारांसह राज्यघटने तील काही आश्वासने देखील अपरिवर्तनीय आहेत हे स्पष्ट केले व सरळ म्हणजे अनुच्छेद २४६ चा उपयोग केवळ शक्ती विभागणी साठी आहे, तर आरक्षण टिकवण्याचा प्रश्न संविधानातील इतर अनुच्छेद, सर्वोच्च न्यायालयीन धोरणे, आणि सामाजिक-राजकीय परिस्थितींवर अवलंबून आहे.म्हणून केवळ अनुच्छेद २४६ अंतर्गत आरक्षण दिल्यामुळे ते आपोआप टिकणार असे नाही, ते संविधान संमत आणि न्यायालयीन मंजुरी प्राप्त असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सध्या मार्गस्त असुन या मधील आरक्षण ५० टक्यांच्या वर गेल्याचे नमुद करतांना सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनास जणू निवडणुका रद्द करण्याचा इशाराच दिला या बाबत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना विचारले की, या मुळे निवडणुका रद्द होण्याची शक्यता आहे काय? असे विचारल्यावर ते म्हणाले की,अनेक जिल्ह्यात मनपा, नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती होऊ घातल्या असुन या निवडणुकांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे इंद्रा साहनी प्रकारणांतील घटना पीठाच्या निकषा नुसार ५० टक्क्या पेक्षा अधिक आरक्षण हे 'ट्रिपल टेस्ट'च्या अटी पूर्ण करत नसल्याने या निवडणुका प्रश्नांकित झाल्या असुन त्यामुळे त्या रद्द होण्याची सुद्धा मोठी शक्यता असल्याचे ते म्हणाले.

पुढे बोलतांना आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दाखला देतांना महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समिती मध्ये एक बाब स्पष्ट केली होती की, समानतेचा मूलभूत अधिकार परिच्छेद १४,१६ हा आरक्षणा पेक्षा उच्च स्तरावर असुन आरक्षण ही केवळ सुविधा आहे म्हणुन तो काही नियम नाही आणि म्हणूनच ५० टक्क्यांहून जास्त आरक्षण देता येणार नाही. ट्रिपल टेस्ट' अनिवार्य का आहे ? या बाबत अत्यंत घटनात्मक आणि अत्यंत अभ्यासु उत्तर देतांना आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, जिप, पंचायत समिती तसेच मनपा निवडणुका या राज्य घटनेच्या परिच्छेद २४३ डी आणि २४३ टी अंतर्गत आरक्षित होतात त्यात प्रामुख्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास वर्ग तसेच महिलां साठी एकत्रित असे ५० टक्के आरक्षण मर्यादा असुन ५० टक्क्यांच्या वरील आरक्षण देण्या साठी सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२१ मध्ये 'ट्रिपल टेस्ट' संकल्पना अनिवार्य केले आहे.आणि हे कार्य करतांना राज्य शासनाने स्वतंत्र मागासवर्ग आयोग नेमावा. त्या आयोगाने समकालीन निरीक्षित आधारीय माहिती म्हणजे इंपिरिकल डाटा गोळा करून त्या त्या समाजाची स्थानिक संस्थां मधील राजकीय मागासले पणा शोधावा लागेल व निश्चित करावा लागेल आणि हे ठरवतांना एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असणे अपेक्षित ठेवले असुन सध्या स्थितीत अद्यावत डेटा नसुन त्यास जुना डेटा आहे असेही म्हणता येईल.

५० टक्क्यांवरील आरक्षणही ट्रिपल टेस्ट संकल्पना पूर्ण करत नसुन अशा परिस्थितीत निवडणुका घेतल्यास त्याना चॅलेंज करता येउ शकते असे घटनात्मक मत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन या निवडणुका अवैध सुद्धा ठरू शकतात, सध्या राज्य भरातील निवडणूक प्रक्रिया सुरू असुन ती संपल्या नंतर उच्च किंवा सर्वोच्च न्यायालय निवडणुक निकाला नंतर त्या निवडणुका अवैध ठरू शकतात. अशा स्थितीत काय पर्याय सांगू शकाल? असा प्रश्न आरक्षणाचे जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना विचारला असता ते म्हणाले की,एक तर घटना दुरुस्ती करून आरक्षणाची मर्यादा वाढवा नाही तर आरक्षण ५० टक्क्यांच्या आत आणा आणि असे जमत नसेल तर निवडणुका पुढे ढकलल्या शिवाय पर्याय नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले असुन असे ते आणि या साठी किमान अर्धा ते एक वर्ष ही लागु शकते. केशवानंद भारती प्रकारणातील न्यायालयाचे स्पष्ट निर्देश राज्य शासन लक्षात घेईल काय ? १३ न्यायधीशांच्या घटना पीठाने केशवानंद भारती प्रकारणात स्पष्टपणे निर्देश दिले की, संसदेला संविधानाच्या दुरुस्तीचा अधिकार आहे, पण तो अधिकार संविधानाच्या "मूलभूत संरचने" (बेसीक स्ट्रक्चर ) बदलण्यासाठी नाही. संविधानाची ही मूलभूत रचना म्हणजे लोकशाही, न्यायिक समीक्षा,संसदीय सार्वभौमत्वा व्यतिरिक्त संविधानाच्या पायाभूत ढाच्याचा भाग ज्यात बदल करणं शक्य नाही.हे प्रकारण ७ विरुद्ध ६या बहुमताने ठरले.हा निकाल संसदेला दिलेल्या अमर्यादित दुरुस्तीच्या अधिकाराला मर्यादा घालणारे ठरले. न्यायालयाने ठरवले की, भारतीय संविधानाची जी "मूलभूत रचना" आहे, ती कोणत्याही प्रकारच्या दुरुस्तीने नष्ट केली जाऊ शकत नाही.या मूलभूत संरचनेत लोकशाही, न्यायालयीन स्वतंत्रता,धर्म निरपेक्षता, लोकशाही निवडणूक व्यवस्था, आणि न्यायपालिका व कार्यकारिणी यांचे स्वतंत्रत्व यांचा समावेश होतो.हे निर्देशन्यायालयाने केशवानंद भारती प्रकरणात पक्के केले असल्याचे स्पष्ट प्रतिपादन आरक्षणाचे जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे. सर्वोच्च न्यायालयातल्या १३न्यायाधीशांच्या घटना पीठच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे संसदेच्या शक्तीवर आणि संविधाना च्या संरक्षणावर मोठा प्रभाव पडला. परिणामी, सर्वोच्च न्यायालयाने भारतीय लोकशाही आणि संविधानाच्या पायाभूत संरचनेची रक्षण करण्याचा मार्ग दाखवला असल्याचे महत्वपूर्ण प्रतिपादन आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.



आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक
**डॉ. राजेंद्र दाते पाटील**